महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८५ वा | दिनांक : ०३/०५/२०२५ | वार : शनिवार

## प्रहारकडून 'डीसीएम टू सीएम' आंदोलनाची घोषणा



**अकोला :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीबाबत अद्याप कोणताही स्पष्ट निर्णय न झाल्यामुळे बच्चू कडू यांनी जूनपासून राज्यभर आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. ‘डीसीएम टू सीएम’ अशा नावाने हे आंदोलन राबवले जाणार असून, त्याची सुरुवात २ जून रोजी बारामती येथून होणार आहे.

बच्चू कडू २ जून रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निवासस्थानासमोर ‘अर्थसंकल्प वाचन आंदोलन’ करून त्यांना कर्जमाफीची आठवण करून देणार आहेत. बारामतीनंतर हे आंदोलन टप्प्याटप्प्याने पंकजा मुंडे, बाळासाहेब पाटील आणि संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहेत. यात सर्वात शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानासमोर आंदोलन करणार असल्याची घोषण बच्चू कडू यांनी केली आहे.

बच्चू कडू यांनी आज अकोल्यात पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना त्यांनी ‘डीसीएम टू सीएम’ आंदोलनाची घोषणा केली. यावेळी बोलताना त्यांनी अजित पवारांनी कर्जमाफीचे आश्वासन आपण दिले नसल्याच्या मुद्द्यावरून जोरदार टीका केली आहे. राष्ट्रवादीचा राजकीय बाप असलेल्या भाजपचे कर्जमाफीचे वचन पूर्ण करणे ही अजित पवारांची जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. शेवटी बापाने दिलेले वचन मुलालाच पूर्ण करावे लागते असा टोलाही त्यांनी अजित पवारांना लगावला.

प्रहार संघटना सरकारवर नाराजी व्यक्त करत असून, कर्जमाफीसंबंधी निर्णय होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले. ७ जुलैपासून ते अमरावती जिल्ह्यातील तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या गुरुकुंज मोझरी किंवा स्वतःचे जन्मगाव असलेल्या कुरळपूर्णा येथे आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या आधी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. जाहीरनाम्यातही त्याचा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, सरकार स्थापन होऊन १०० दिवस उलटून गेले. मात्र, अद्यापही शेतकरी कर्जमाफीबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. अशातच उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत कर्जफेड करावी असे वक्तव्य होते. त्यामुळे शेतकरी तसेच प्रहार संघटना आक्रमक झाली असून राज्य सरकारविरोधात पुन्हा एकदा जनआंदोलन उभं राहताना दिसत आहे.

## शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले?: अजित पवार

**कोल्हापूर :** महायुतीचे सरकार सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाईल, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांकडून विधानसभा निवडणुकीच्या वेळी देण्यात आले आहे. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर कर्जमाफी मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, तसा कोणताही निर्णय झाला नाही. अशातच राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले, असा थेट उलटसवाल केला. अजित पवारांच्या या वक्तव्यावरून नवीन वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज कोल्हापूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना आपल्या रोखठोक शैलीत शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर उत्तर दिले. शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका केली होती. त्याबाबत उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांना पत्रकारांनी प्रश्न विचारले. त्यावर अजित पवारांनी उलट सवाल केला. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले? मी दिले आहे का? मी तरी दिले नाही, असे म्हणत एक प्रकारे या मुद्द्याला बगल देण्याचा प्रयत्न केला

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारकाळात महायुतीच्या अनेक नेत्यांनी, सत्तेवर आल्यानंतर राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल, असे आश्वासन दिले होती. त्याचप्रमाणे लाडकी बहीण योजनेच्या मानधनात वाढ करण्याचाही शब्द देण्यात आला होता. मात्र, सत्तेवर आल्यानंतर या आश्वासनांच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट भूमिका घेतली जात नसल्याची टीका केली जात आहे. येणाऱ्या काळात विरोधक या मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतील.

दरम्यान, अजित पवार यांनी बीडमध्ये एका कार्यक्रमात बोलताना कर्जमाफीवर भूमिका स्पष्ट केली होती. मी ३१ तारखेच्या आत पीक कर्ज भरा सांगितले. तर त्याच्यावरून टीका केली. जाहीरनाम्यामध्ये जरुर सांगितले होते पण माझ्या एकाही भाषणात मी कुठेही सांगितले नव्हते. माझी भाषणे काढून बघा. माझ्या भाषणात कधी तुम्ही कर्जमाफी ऐकले का? कारण मी त्याचा उल्लेख केला की, सगळी सोंग करता येतात पैशाचे सोंग करता येत नाही. विरोधक म्हणतात तुम्हाला घोषणा करताना आठवले नाही का? अशी टीका होणार, पण शेवटी राज्याला आर्थिक शिस्त पण लागली पाहिजे. ते नियोजन बिघडता कामा नये, असे अजित पवार म्हणाले होते.

## आमदार जितेंद्र आव्हाड यांना जीवे मारण्याची धमकी!



**मुंबई :** शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांना एका अज्ञात व्यक्तिकडून जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. याबाबत आव्हाड यांनी ट्विटर एक्सवर माहिती दिली आहे. तसेच धमकी देणाऱ्याचा मोबाइल क्रमांक पोस्ट करुन पोलिसांनी दखल घ्यावी, असेही त्यांनी म्हटले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ मे २०२५

## जि. प. प्रा. शाळा खांडी पिंपळगाव येथे महाराष्ट्र दिनानिमित्त शालेय श्रीमती वर्षाताई नामदेव कोकणे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** दिनांक १ मे २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांडी पिंपळगाव येथे महाराष्ट्र दिनानिमित्त शालेय व्यवस्थापन समिती सदस्य श्रीमती वर्षाताई नामदेव कोकणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी सरपंच श्री.सज्जनसिंग झाला,ग्रामसेवक श्रीमती एस डी.गवळी मॅम,प्राध्यापक डॉक्टर श्री.कृष्णा मालकर, पोलीस पाटील श्री.जनार्दन उबाळे , शिक्षण प्रेमी श्री.मिठ्ठू आप्पा महालकर, प्रतिष्ठीत नागरिक ,सर्व ग्रामस्थ ,सर्व शिक्षक ,सर्व विद्यार्थी उपस्थित होते .यावेळी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण बारा विद्यार्थी पात्र ठरले .या पात्र विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच प्राध्यापक डॉक्टर कृष्णा मालकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप केली ,तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर संबोधन केले .यावेळी मुख्याध्यापक श्री गणेश काळे सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले .




## महाराष्ट्र दिन उत्सहात, कामगार हे राज्याचे शिल्पकार : प्राचार्य डॉ संजय अस्वले



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन साजरा करताना सामाजिक, आर्थिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून त्यांच्यात अप्रत्यक्ष संबंध आहे याची प्रचिती येते.कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन यांचा थेट इतिहास वेगळा असला, तरी सामाजिक व औद्योगिक दृष्टिकोनातून ते एकमेकांचे पूरक आहेत.

कामगार वर्गाशिवाय महाराष्ट्राच्या प्रगतीची कल्पनाच अशक्य आहे. त्यामुळे एकाचा सन्मान (कामगार दिन) आणि दुसऱ्याचा गौरव (महाराष्ट्र दिन) एकत्र येणे हे अत्यंत अर्थपूर्ण आहे.कामगार हे राज्याच्या विकासाचे खरे शिल्पकार आहेत, ही भावना महाराष्ट्र दिनाच्या उत्सवात निर्माण होते असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय एक मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनानिमित्त डॉक्टर अस्वले यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि शुभेच्छा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलताना ते म्हणाले महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली, त्या काळात मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे यांसारखी शहरे औद्योगिक केंद्रे होती. या उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणावर कामगारवर्ग निर्माण झाला.

कामगारांचे हित जोपासणे हे महाराष्ट्र राज्याच्या विकासाचे महत्त्वाचे अंग बनले. त्यामुळे महाराष्ट्राची ओळख एका कामगारहितैषी राज्य म्हणून झाली आहे. कामगार चळवळींमुळे समाजात हक्कांची जाणीव, संघटनाशक्ती आणि संघर्षशीलता वाढली. ह्या चळवळींनी राजकीय दबाव निर्माण करून समाजातील मागास घटकांचे प्रतिनिधित्व वाढवले, जे महाराष्ट्राच्या सामाजिक धोरणांवर प्रभाव टाकणारे ठरले आहे. महाराष्ट्र सरकारने स्थापनेनंतर कामगार कल्याण, सुरक्षा, वेतन, आणि सामाजिक हमी यांसाठी अनेक धोरणे राबवली.

म्हणजेच, कामगार चळवळींनी प्रेरणा दिलेली राज्यधोरणे महाराष्ट्र दिनाच्या स्थापनेनंतर अधिक प्रभावी झाली.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी ए पिटले, उपप्राचार्य प्रा. जी एस मोरे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंत्री जयकुमार गोरे व माजी मंत्री बसवराज पाटील यांच्यात विविध विषयांवर चर्चा....



मुरूम, ता. उमरगा येथील पाटील यांच्या निवासस्थानी विजयकुमार गोरे यांचा सत्कार करताना बसवराज पाटील, बापूराव पाटील, शरण पाटील, संताजी चालुक्य व अन्य पदाधिकारी.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या निवासस्थानी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवारी रोजी दुपारी सदिच्छा भेट देण्यात आली. यावेळी पाटील परिवाराकडून माजी मंत्री बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते मंत्री जयकुमार गोरे यांचा विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते प्रकाश आष्टे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीप भालेराव, कैलास शिंदे, रफिक तांबोळी, उमरगा पंचायत समितीचे माजी सभापती मदन पाटील, सचिन पाटील, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, रशिद शेख, विकाससेसो चे माजी चेअरमन दत्ता चटगे, पप्पू सगर, महेश माशाळकर, विजय सोनकटाळे, योगेश राठोड, व्यंकट कोरे, विक्रम मस्के, देवेंद्र कंटेकुरे, परमेश्वर टोपगे, प्रशांत गायकवाड, महालिंग बाबशेट्टी, संजय पाटील, शिवराज पाटील आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी उपकार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, शाम गोडबोले, उपविभागीय पोलिस अधिकारी सदाशिव शेलार, पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, सपोनि संदीप दहिफळे, मुख्याधिकारी सचिन भुजबळ आदी अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी बसवराज पाटील व मंत्री जयकुमार गोरे यांच्यामध्ये उमरगा-लोहारा तालुक्यातील विविध प्रश्नांवर व विकास कामाच्या संदर्भात विस्ताराने चर्चा करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ मे २०२५

## महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त बसव प्रतिष्ठाणच्या वतीने अभिवादन...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** अक्षय तृतीय या शुभ मुहूर्तावर संपूर्ण देशभर जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. लोकशाहीचे आद्यजनक महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकातील थोर समाजसुधारक होते. बुधवारी (ता.३०) रोजी अक्षय तृतीय तिथीनुसार मुरूम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बसव प्रतिष्ठाणच्या अखिल भारतीय सामाजिक संघटनेमार्फत पूर्णाकृती पुतळ्याचे स्थापना करण्यात आली.

मुरूम पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस फौजदार ज्ञानेश्वर गव्हाणे, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, चंद्रशेखर मूदकण्णा,सिद्धेश्वर भालेराव,अमृत वरनाळे, माजी सैनिक विजयकुमार हिरेमठ, भगत माळी,राहुल वाघ,आप्पासाहेब बिराजदार,रफिक पटेल, किरण गायकवाड यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे, डिंगबर सोनटक्के,प्रा.करबसप्पा ब्याळे,प्रा.महेश मोटे,काशिनाथ मीरगाळे,शिवा मूदकण्णा,महेंद्र कांबळे,शंकर सोलापुरे, सुरेंद्र सक्करगी, प्रा.सादु गायकवाड,अमित ढाले,उमेश ईकळगे,अर्जुन कदम आदीसह बसव भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतीवर्षीप्रमाणे यंदाही जयंतीनिमित्त एक दिवशीय पुतळा प्रतिष्ठापना करण्यात आली.

राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मे महिन्यात राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. व त्याच बरोबर श्री महात्मा बसवण्णा पोवाड्याचे आयोजन करण्यात आले आहे, सदर कार्यक्रमाचे आयोजन मुरूम शहरातील रत्नमाला मंगल कार्यालयात दि.२५ मे रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती बसव प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी दिली.

## २ री आमंत्रित राज्यस्तरीय नॉन कॉपिटिटिव जिम्नॅस्टिक्स स्पर्धा के.आर.एस स्पोर्ट्स अकॅडमीमधे थाटात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर (शिवाजी गायकवाड) :** येथे दि. २७ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना आणि ओरंगाबाद जिल्हा जिमनॅस्टिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमानाने,कुमीरा रावण शिंदे बहुद्देशीय सेवा भावी संस्था रजी. के आर एस स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित २ री आमंत्रित राज्यस्तरीय नॉन कॉपिटिटिव आर्टिस्टिक व एक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धा के.आर.एस स्पोर्ट्स अकॅडमी ऐथे थाटात पार पडली.राज्यातून या स्पर्धेसाठी मुंबई , ठाणे,नागपूर, वर्धा, नाशिक,रायगड,छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातून २५० खेळाडूनी सहभाग नोंदवला.

तर ४०० पेक्षा अधिक पालकांची उपस्थिती होती.आर्टिस्टिक्स मुलं आणि मुली वयोगट ६,८,१०,१२व १४ असा होता. तसेच एक्रोबॅटिक्स मधे वयोगट ११ ते १६ मधे महिला दुहेरी, मिश्र दुहेरी,पुरुष दुहेरी हे तीन प्रकार घेण्यात आले होते. खेळाचा प्रचार आणि प्रसार तसेच छोट्या वयोगटातील खेळाडुनसाठी एक मोठ्या स्तरावर स्पर्धा खेळण्याचा अनुभव यावा या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर च्या के. आर .एस स्पोर्ट्स अकॅडमीचा सर्व वयोगात दबदबा राहील तसेच सांघिक विजेतेपद प्रथम क्रमांक संभाजीनगर के आर एस स्पोर्ट्स अकैडमी यांनी पटकावला.

दुसरा क्रमांक देव स्पोर्ट्स अकॅडमी रायगड तर तिसरे स्थान नाशिक जिल्हा युनिक जिम्नॅस्टिक्स अकॅडमी यांनी मिळवला .या स्पर्धेला प्रमुख पाहुणे व स्पर्धेचे उद्धाटन एस आर पी एफ-१४ कमांडेड श्री.विक्रम साली साहेब, डॉ बाबाआंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रभारी संचालक डॉ संदीप जगताप सर, मा.क्रिडा उपसंचालक महाराष्ट्र राज्य श्री जगन्नाथ आदाने सर,एम.जी.एम विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर क्रीडा विभाग प्रमुख डॉ दिनेश वंजारे सर,के. आर.एस स्पोर्ट्स अकॅडमी चे अध्यक्ष श्री रावण शिंदे सर,ओरंगाबाद जिल्हा जिम्नॅस्टिक्स संघटनेचे उपाध्यक्ष डॉ. रणजीत पवार,श्री राहुल तांदळ,श्री संदीप गायकवाड, डॉ.शशीकांत सिंग,डॉ.श्रीनिवास मोतिऐले,सूर्या उद्योग समूहाचे सुनिल म्हस्के, संदिप म्हस्के हे लाभले.सूत्र संचालन अकॅडमी चे सचिव अंतरराष्ट्रीय पंच प्रशिक्षक प्रा.प्रविण शिंदे सर आणि स्पर्धा प्रमुखाची भूमिका महाराष्ट्र राज्याचा सर्वात मानाचा पुरस्कार प्राप्त असलेल्या अंतरराष्ट्रीय पंच श्री अरविंद शिंदे ,तर पंचांची भूमिका अंतरराष्ट्रीय खेळाडु शुभम सरकटे, हर्षल आठवले, रिद्धी जैस्वाल,सलोनी म्हस्के,प्रिया आगिवाले, बाबासाहेब अयवळे, सुनिल माणकर,ज्योती शिंदे, मुकेश ग्यार, सिद्धांत सोनटक्के, नूपुर लाडवानी, क्रांतीकुमार नरवडे, संभाजी चव्हाण, आदित्य कदम, पार्थ रामशेतवाड, साहिल माळी यांनी बजावली तर बक्षिस समारंभ सौ.प्रियंका शिंदे व आभार प्रदर्शन सौ.विद्या शिंदे यांनी केले.राज्य स्थरीय स्पर्धा यशस्वी रित्या पार पाडल्याबद्दल महाराष्ट्र राज्य हौशी जिम्नॅस्टिक्स संघटचे सचिव डॉ मकरंद जोशी यांनी सर्व अकॅडमीच्या पदाधिकाऱ्यांचे ,सर्व खेळाडू, प्रशिक्षक,पंच तसेच पालकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# करोडी ग्रामसंसद कार्यालयाचे लोकार्पण




**करोडी (शिवाजी गायकवाड)** ता.छत्रपती संभाजीनगर येथील ग्रामसंसद कार्यालयाचे उदघाटन जालनाचे खासदार डॉ.कल्याण काळे जालना व माजी पंचायत समिती सभापती सर्जेराव चव्हाण यांच्या हास्ते करण्यात आले. पुर्वी करोडी व साजापुर गृप ग्रामपंचायत एकत्र होती.माजी सभापती सर्जेराव चव्हाण करोडीकराचा मेहतीने काही दिवसापुर्वीच करोडी ग्रामपंचायत स्वतंत्र झाली. दि.1 मे रोजी नवीन ईमारतीचे करोडी ग्रामसंसद कार्यालयाचे उदघाटन खासदार डॉ.कल्याण काळे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच सर्जेराव चव्हाण यांच्या वाढदिवस साजरा करण्यात आलायावेळी डॉ.कल्याण काळे साहेब खासदार,सतिश चव्हाण विधान परिषद आमदार पदवीधर मतदार संघ,विनोद पाटील अध्यक्ष अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानसर्जेराव पाटील चव्हाण माजी उपसभापती,विजय शेषराव जाधव माजी पंचायत समिती सदस्य,सुनिताबाई देविदास गवंदे सरपंच,सोमनाथ राधाकिसन नवले उपसरपंच, रमा कांबळे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत सदस्य सोनाली जनार्धन दवंडे, सिंधुबाई कडुबाळ गडगुळ, दगडु रामभाऊ चव्हाण,मनिषा कैलास जाधव, योगेश्वरी समाधान जाधव, सोमीनाथ रावसाहेब गोल्हार,माजी dysp अशोक आम्ले,वनिता मुळे एकनाथ मुळे,दिपक घुसळे,प्रकाश गडगुळ, ह भ प रामभाऊ,माजी सरपंच सैय्यद हारून, रणजित गायकवाड, मुनिर पटेल,सलीम पटेल, जनार्दन गवळी,भारत भास्कर ,रामू सुराशे,गणेश जाधवयांची प्रमुख उपस्थिती तसेच परिसरातील पंचक्रोशीतील सरपंच उपसरपंच, सदस्य व प्रतिष्ठित नागरिक मित्रमंडळ यानी शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील सर्व गावकरी महिला उपस्तीत होता.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्राध्यापक शिवाजी गायकवाड यानी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०३ मे २०२५


## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने शतकोत्तर १०७ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, १ मे ला महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन महोत्सव साजरा केला जातो. निमित्ताने विषय : "जस्टीस ऑफ पीस" पुरस्कार प्राप्त भारतीय कामगार चळवळीचे जनक सत्यशोधक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १०७ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक १ मे २०२५, गुरूवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपण सर्व मानवतावादी व्यक्तींनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला औद्योगिक संघटना मसिआ चे अध्यक्ष अर्जुन गायकवाड हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. मनपा कामगार युनियनचे नेते बंडू कांबळे हे विशेष मार्गदर्शन करणार आहेत.

तर प्रमुख वक्ते म्हणून प्रतिष्ठान महाविद्यालयाचे प्राध्यापक डाॅ उमाकांत राठोड हे मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त आयोजित या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता १०७ व्या शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## महात्मा बसवेश्वरांनी जातिव्यवस्था आणि कर्मकांडास विरोध केला : डॉ. कल्याण कुंभार




**जालना :** महात्मा बसवेश्वरांनी लोक भाषेत वचन साहित्याची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करून समाजसुधारणा व प्रबोधन करण्याचे कार्य केले. त्यांनी जातिव्यवस्था आणि कर्मकांडास मोठा विरोध केला. सामाजिक विषमता प्रगतीकडे जाऊ देत नाही, त्यासाठी नव्या सुधारणा स्वीकारणे गरजेचे आहे. समतेशिवाय समाज खऱ्या अर्थाने विकसित होऊ शकत नाही. महात्मा बसवेश्वर हे सामाजिक न्याय, समानता, आणि सुधारणेचे प्रतीक होते असे प्रतिपादन डॉ. कल्याण कुंभार यांनी केले.

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती निमित्ताने ते बोलत होते. यावेळी त्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या जीवन कार्यांची ओळख करुन देतांना महात्मा बसवेश्वरांची वचने, यावर प्रकाश टाकला.ते पुढे म्हणाले की महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंडपम ची स्थापना करुन गावगाड्यात सर्वांना समान पातळीवर आणून खुल्या चर्चेसाठीचे एक व्यासपीठ निर्माण करुन दिले व गावगाड्यातील समस्या तेथेच सोडविण्यासाठी एक मंच तयार करुन दिला.

अनुभव मंडपम हे त्यावेळचे लोकशाही केंद्रच होते असे म्हणता येईल. येथे सर्व स्तरातील लोक विचारमंथनासाठी एकत्र येत असत. कुठलाही भेदभाव केला जात नसे. शरण-शरणीच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. कुठल्याही जातीतील स्त्री पुरुष असो त्याला शरणी आणि शरण म्हणून ओळखले जात या माध्यमातून जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. यावेळी मा. प्राचार्य डॉ.कविता प्राशर यांनी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी प्रा.संदीप पाटील, प्रा.अभिजीत भूतेकर, विजय लोणकर, राम हिवरेकर, अजय जोशी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# 'लाडकी बहीण'मुळे २०२७ पर्यंत कोणतेही काम होणार नाही



**जालना :** महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण पडत असल्याची चर्चा सुरू आहे. तसेच राज्यात झालेल्या पिक विमा घोटाळ्यावरून काँग्रेसचे नेते आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला आहे. पिक विमा बोगस योजना बोगस असून हे फार मोठे रॅकेट आहे, अशी टीका कैलास गोरंट्याल यांनी केली आहे.

तसेच लाडकी बहीण योजनेमुळे २०२७ पर्यंत कोणतेही काम येणार नाही, आणि होणारही नाही, असा दावाही गोरंट्याल यांनी केला.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली होती. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना महिन्याला दीड हजार रुपयांचे मानधन दिले जाते. मात्र या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर ताण पडत असल्याची चर्चा आहे. तसेच सरकार इतर योजनांचा पैसा हा लाडकी बहीण योजनेकडे वळवत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कैलास गोरंट्याल यांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

पिक विमा योजनेबाबत कैलास गोरंट्याल म्हणाले की, पिक विमा बोगस आहे. पिक विमा योजनेमध्ये गैरप्रकार झाल्याचे मी अधिवेशनामध्ये सुद्धा बोललो होतो. ज्या माणसाला शेती नाही त्याला पैसे भेटतात आणि ज्याला खरी शेती आहे त्याला काहीच भेटत नाही. पिक विमा हे फार मोठे रॅकेट आहे. एक रुपयात पिक विमा ही तर फसवी योजना होती.

लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना कैलास गोरंट्याल यांनी मोठा दावा केला आहे. लाडकी बहीण योजनेमुळे तर २०२७ पर्यंत कोणतेही काम येणार नाही आणि होणारही नाही, असे गोरंट्याल म्हणालेत. मी पोलिस खात्यातल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत बोललो, तर मला अशी शंका यायला लागली, आमचे पगार पण येतात की नाही. एसटी महामंडळाच्या लोकांचे अर्धे पगार भेटलेच नाही अशी अवस्था सध्या आहे, असेही गोरंट्याल म्हणाले. त्यामुळे या सर्व फसव्या योजना आहेत आणि यामुळे सर्व काही त्यांच्या अंगावर येणार आहे. त्यामुळे याला जबाबदार त्यावेळचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हेच आहेत असा आरोप कैलास गोरंट्याल यांनी केला आहे.

खोटे बोलून, लाडकी बहीण योजनेचे लॉलिपॉप दाखवून ते सत्तेवर आले, २१०० रुपये बोलले होते, परंतु पंधराशे रुपये सध्या नीट देत नाहीत. योजनेतील लाभार्थ्यांची काट छाट सुरू झालेली आहे. २ कोटी ३० लाख महिलांनी याचा फायदा घेतला, त्यामुळे तेवढे मतदान यांना फुकट भेटले, असा टोला कैलास गोरंट्याल यांनी सरकारला लगावला आहे.